'द न्यूज बिज टाईम्स'

दि. २/९/२०२६ पिंपरी, महाराष्ट्र, thenewzbiz@gmail.com वर्ष - दुसरे डिजीटल आवृत्ती

# महाविद्यालये वेगळी, ध्येय एकच; सायबर योद्ध्यांनी घडवला सहकार्याचा नवा आदर्श



पिंपरी, प्रतिनिधी : क्लिक हील फाउंडेशन आणि डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या सायबर वॉरियर्स क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा आणि डिजिटल सुरक्षिततेबाबत सातत्यपूर्ण जनजागृती केली जात आहे. याच उपक्रमांतर्गत यावर्षीच्या 'थिंक बिफोर यू क्लिक' आणि 'माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलिटी' या संदेशांना केंद्रस्थानी ठेवत सायबर जनजागृतीचा प्रभाव अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरी आणि प्रतिभा महाविद्यालय, चिंचवड येथील सायबर वॉरियर्स क्लब यांच्या परस्पर सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमांतर्गत दोन्ही महाविद्यालयांतील सायबर योद्ध्यांनी एकमेकांच्या महाविद्यालयात सायबर जनजागृती सत्रे घेत ज्ञान, अनुभव आणि सादरीकरणाच्या कौशल्यांची देवाणघेवाण केली. डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयातील सायबर योद्ध्यांनी प्रतिभा महाविद्यालय, चिंचवड येथे जाऊन विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, डिजिटल फसवणूक, ऑनलाइन सुरक्षितता आणि जबाबदार डिजिटल वर्तन याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रतिभा महाविद्यालयातील सायबर योद्ध्यांनी डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयात सत्र घेऊन विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण केली.

या परस्पर सहभागामुळे दोन्ही महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना सायबर जनजागृती प्रभावीपणे कशी मांडावी, विद्यार्थ्यांशी संवाद कसा साधावा आणि विविध माध्यमांतून सायबर सुरक्षेचा संदेश अधिक परिणामकारकपणे कसा पोहोचवावा, याचा अनुभव मिळाला. 'एकत्र पुढे जाणे' या विचारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ झाली.

या उपक्रमाला डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स क्लबचे शिक्षक समन्वयक प्रा. सत्यवान कुंजिर, तसेच प्रतिभा महाविद्यालयाच्या समन्वयक हर्षिता मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स क्लबच्या अध्यक्षा नेहा माडीवाळकर आणि प्रतिभा महाविद्यालयाच्या अध्यक्षा स्नेहा यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला.

क्लिक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांच्या प्रेरणादायी नेतृत्वातून, तसेच क्लिक हील फाउंडेशनचे असोसिएट डायरेक्टर अजय शिर्के यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने सायबर वॉरियर्स क्लबच्या सायबर जनजागृतीच्या कार्याला सातत्याने दिशा मिळत आहे.

या उपक्रमासाठी संस्थेचे चेअरमन पी. डी. पाटील, सचिव सोमनाथ पाटील, प्राचार्य डॉ. रणजित पाटील, सायबर वॉरियर्स क्लबचे शिक्षक समन्वयक प्रा. सत्यवान कुंजिर यांनी सायबर योद्ध्यांचे कौतुक करत त्यांच्या पुढाकाराचे आणि सहकार्याच्या भावनेचे विशेष अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेचा संदेश केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता तो कुटुंब, मित्र आणि समाजातील अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवावा, तसेच अशा जनजागृतीपर उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी व्हावे, यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले.